# ऑनलाइन प्रवेश परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील पदव्युत्तर विभागातील अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाच्या प्रवेशासाठी ऑनलाइन प्रवेश परीक्षा सुरू आहे. रसायनशास्त्र विभागातील विविध अभ्यासक्रमांसाठी २८ केंद्रांवर ३७६० विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षा दिली. विद्यापीठाने यंदा पुणे, बेळगाव, सोलापूर येथेही प्रवेश परीक्षेसाठी सोय केली होती. दरम्यान अन्य ११ अभ्यासक्रमासाठी ९४९ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षा दिली. ११४४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. १९५ विद्यार्थी गैरहजर राहिले.

# विद्यापीठात आहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात इतिहास अधिविभागाच्या वतीने आहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते आहिल्यादेवी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी प्रा. अवनिश पाटील, दत्तात्रय मचाले, डॉ. निलांबरी जगताप उपस्थित होते.